खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### पवार पब्लिक ट्रस्ट शिष्यवृत्ती वाटप

सकाळ

# 'पवार पब्लिक ट्रस्ट'तर्फे शिष्यवृत्तीचे वाटप

राजगुरुनगर, ता. २८ : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यातील, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या ठेवीच्या व्याजातून या वर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे तीन लाख २९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाला ५० लाख रुपयांची ठेव दिलेली आहे. त्यांनी सुचविल्याप्रमाणे त्या ठेवीतून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते.



**राजगुरुनगर, (ता. खेड) : पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप करताना मान्यवर.**

शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाप्रसंगी संस्था अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गाणू, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

शिष्यवृत्तीधारकांमध्ये गुणवंत, परंतु आई-वडील नसलेले,मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना १ लाख ३२ हजार, साहेबराव बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १३ विद्यार्थ्यांना ३७ हजार, तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार, असे एकूण ३ लाख २९ हजार रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयात शिक्षण घेणारा गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे सांगून शिष्यवृत्तीचा विनियोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कारणासाठी करावा, तसेच आपापल्या जीवनात यशस्वी झाल्यावर विद्यार्थ्यांनी दातृत्वाची भावना मनात जपून ठेवावी, असे आवाहन या प्रसंगी अ‍ॅड. बुट्टेपाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी, तर आभार प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी मानले.

Pune, District-Today
29/01/2023 Page No. 5

लोकमत

# पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ३ लाख २९ हजारांच्या शिष्यवृत्तीचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यात लोकनेते शरदराव पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रय वळसे पाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. यावर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख २९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गाणू, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एम. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

१२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार असे एकूण ३ लाख २९ हजार रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी आभार मानले.

या शिष्यवृत्तीधारकांमध्ये गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीअंतर्गत १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्तीअंतर्गत सुमारे १ लाख ३२ हजार, साहेबराव बुट्टेपाटील शिष्यवृत्तीअंतर्गत ३७ हजार तसेच दत्तात्रय वळसे पाटील शिष्यवृत्तीअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात आली.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 23, 2023
Powered by: erelego.com

# विद्यार्थ्यांना ३ लाख २९ हजारांच्या शिष्यवृत्तीचे वाटप

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यात लोकनेते शरदराव पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टे पाटील आणि दत्तात्रय वळसे पाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. या वर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख २९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

**पवार पब्लिक चॅरिटेबलचा उपक्रम**

यानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गाणू, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली, त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

या शिष्यवृत्तीधारकांमध्ये गुणवंत; परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडाक्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीअंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्तीअंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख ३२ हजार, साहेबराव बुट्टे पाटील शिष्यवृत्तीअंतर्गत १३ विद्यार्थ्यांना ३७ हजार तसेच दत्तात्रय वळसे पाटील शिष्यवृत्तीअंतर्गत १२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार, असे एकूण ३ लाख २९ हजार रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी शिष्यवृत्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल लोकनेते शरद पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयात शिक्षण घेणारा गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे सांगून शिष्यवृत्तीचा विनियोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कारणासाठी करावा तसेच आपापल्या जीवनात यशस्वी झाल्यावर विद्यार्थ्यांनी दातृत्वाची भावना मनात जपून ठेवावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Jan 24, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

Date of Publication : बुधवार, दि. २५ जानेवारी २०२३ R.N.I. MAI

गुड मॉर्निंग

खेड तालुका विशेष

प्रभात पुणे, बुधवार, दि. २५ जानेवारी २०२३ ४

# गुणवंत, गरजू ११५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**राजगुरूनगर, दि. २४ (प्रतिनिधी) - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यात लोकनेते शरदराव पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५० लाख रूपये जमा करण्यात आले आहेत. या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. या वर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख २९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.**

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गाणू, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सव्वातीन लाखांच्या शिष्यवृत्ती वाटप

या शिष्यवृत्ती धारकांमध्ये गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख ३२ हजार, साहेबराव बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १३ विद्यार्थ्यांना ३७ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार असे एकूण ३ लाख २९ हजार रूपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी शिष्यवृत्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल शरद पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयात शिक्षण घेणारा गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ३ लाख २९ हजारांच्या शिष्यवृत्तीचे वाटप

राजगुरुनगर (दै. संध्या) :

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यात लोकनेते शरदराव पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५० लाख रूपये जमा करण्यात आले आहेत.

या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. या वर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख





२९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गानू , बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या शिष्यवृत्तीधारकांमध्ये गरीब-गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख ३२ हजार, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १३ विद्यार्थ्यांना ३७ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार असे एकूण ३ लाख २९ हजार रूपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी शिष्यवृत्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल लोकनेते शरदराव पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयात शिक्षण घेणारा गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत असे सांगून शिष्यवृत्तीचा विनियोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कारणासाठी करावा तसेच आपापल्या जीवनात यशस्वी झाल्यावर विद्यार्थ्यांनी दातृत्वाची भावना मनात जपून ठेवावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. धनंजय बोहडे यांनी मानले.

HRC

## शिष्यवृत्ती वाटप...

राष्ट्रसंचार छायाचित्र सेवा



**राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.**

# पवार ट्रस्टतर्फे ३.२९ लाख शिष्यवृत्तीचे वाटप

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बँक खात्यात लोकनेते शरदराव पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५० लाख रूपये जमा करण्यात आले आहेत. या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. या वर्षी ११५ विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख २९ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गानू, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ.व्ही. डी.कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या शिष्यवृत्ती धारकांमध्ये गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख २८ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे १ लाख ३२ हजार, साहेबराव बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १३ विद्यार्थ्यांना ३७ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १२ विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार असे एकूण ३ लाख २९ हजारांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी शिष्यवृत्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल लोकनेते पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयात शिक्षण घेणारा गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत असे सांगून शिष्यवृत्तीचा विनियोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कारणासाठी करावा तसेच आपापल्या जीवनात यशस्वी झाल्यावर विद्यार्थ्यांनी दातृत्वाची भावना मनात जपून ठेवावी, असे आवाहन बुट्टेपाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**